# भारतीय स्त्री जीवनाची यशस्वी वाटचाल

प्रा. शोभा काळे
प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

भारतीय संस्कृती मध्ये स्त्रीच्या सन्मानार्थ खूप सुंदर सुवचन सांगितले आहे. ते की ''यत्र नार्यस्तू पूज्यते रमन्ते तत्र देवताः'' अर्थात जेथे स्त्रीचा मानसन्मान केला जातो तेथेच देवतांचे वास्तव्य असते.

प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक काळात जो इतिहास घडला आणि जो आपल्यापुढे मांडला गेला त्यामध्ये बहुतांशी पुरूषांच्या कर्तबगारीवरच प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झाला आहे. समाजकारण, अर्थकारण, प्रशासन राजकारण या वेगवेगळ्या क्षेत्रातील पुरूषांचे कर्तृत्व प्रकाशात आणले गेले. भारतीय इतिहासात स्त्री केवळ चूल आणि मूल या रहाटगाडग्यातच अडकविली गेली आणि इतर क्षेत्रात तिच्या कर्तृत्तवाला अटकाव केला गेला होता असे जाणवायला लागते. मग कुटूंब या संस्थेच्या बाहेर जावून शिक्षण घेणे, समाजकारण करणे उद्योगव्यवसायात सक्रिय राहणे, राजकारणात भाग घेणे, प्रशासनात उच्चपदे भूषवणे इ.क्षेत्रात स्त्रीला वावच नव्हता म्हणून तिचा विकास खुंटला की काय? अशी शंका मनात आल्याशिवाय राहत नाही. भारतात सामाजिक, राजकीय, प्रादेशिक, धार्मिक अशा चळवळीतून स्थित्यंतरे झालेली आहेत. विशेषतः भारतीय स्त्री जीवनाचा अभ्यास करताना देखील या स्थित्यंतरांचा आढावा घेणे तितकेच महत्वपूर्ण आहे.

प्रस्तुत विषयामध्ये भारतीय स्त्रीच्या कर्तृत्त्वाचा, स्वाभिमानाचा, तिच्या उत्तुंग यशाच्या वाटचालीचा आढावा घेण्याचा, तसेच भारतीय स्त्रीमुक्ती या संकल्पनेचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

वेदकालीन समाजजीवनामध्ये स्त्रियांना मानाचे स्थान होते. स्मृती काळामध्ये स्त्रियांवर अनेक बंधने निर्माण होऊन न स्त्रीस्वातंत्र्यमर्हति अशा प्रकारची भूमिका मनुस्मृतीने घेतलेली आढळते. स्मृती काळानंतर स्त्रियांविषयी भारतीयांची भूमिका अधिक ताठर बनून स्त्रियांना शुद्र म्हणून लेखले जाऊ लागले.

विविध ग्रंथातून स्त्रीला माता, देवी, लक्ष्मी संबोधून तिचा गौरव केला जातो प्रत्यक्षात मात्र उपेक्षाच केली जाते. स्त्रियांवर जेवढे जास्त निर्बंध तेवढी त्या कुटुंबाची जास्त प्रतिष्ठा मानली जात होती. मुलांचे बालविवाह होत. जरठकुमारी विवाहाचे प्रमाण खूप होते, त्याचबरोबर सती जाण्याचा प्रकारही भयानक होता. एखाद्या विधवा मुलीने सती जायला नकार दिला तर तिला जबरदस्तीने चितेवर ढकलले जायचे,तिच्या ओरडण्याचा आवाज कोणाला ऐकू येवू नये म्हणून ढोल ताशे जोरजोरात वाजविले जात असत.

महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या क्रांतिकारक जोडप्याचे नाव समाज क्रांतीच्या जागतिक इतिहासात ललामभूत अशी ठरली आहेत. या उभयतांनी इ.स.१८४८ पासून स्त्री शिक्षणाला सुरूवात केली. शिक्षणबंदी, विधवा-विवाह ही सारी बंधे मोडून टाकण्याची घोषणा करुन स्त्रीमुक्तीचा झेंडा फडकविला. त्यावेळी जगातल्या बहुतेक स्त्रिया भारतीय स्त्रियांप्रमाणेच कष्ट करीत होत्या. हाल भोगत होत्या, त्रास सोशित होत्या. जातीभेद, उच्चनीचता, इत्यादींनी सारा समाज जखडून बांधला गेला होता. याला कारण पुरूषप्रधान समाजरचना होय असे त्यांचे मत होते.

जी स्त्रीमुक्ती महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना अपेक्षित होती ती आज झाली आहे का?

भारतीय स्त्री स्वतंत्र व स्वतःचा स्वाभिमान निर्माण करुन स्वतःच्या विचाराने जगणारी झाली आहे का?

तिला स्वतंत्र व्यक्ती म्हणून समाजात, कुटूंबात स्थान मिळाले आहे का? नक्कीच याचे उत्तर सकारात्मकच दयावे लागेल. त्यांनी जे आत्मसन्मानाचे रोप लावले होते. त्याचे रुपांतर विशाल वृक्षात झाले आहे.

एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाचे स्त्रियांच्या जीवनाच्या दृष्टीने दोन भाग स्पष्टपणे दिसतात. स्वातंत्र्यापर्यंतचा काळ स्त्रियांच्या धडपडत प्रगती करण्याचा, स्वतःला ओळखण्याचा काळ होता असे म्हणता येते स्वातंत्र्यानंतर त्यातही घटनेने स्त्रियांना समानता दिल्यानंतरचा काळ स्त्रियांच्या प्रगतीच्या, कर्तृत्वाच्या दृष्टीने वाढ आणि विस्ताराचा काळ म्हणता येतो. या काळात स्त्रियांचे कर्तृत्व विस्तारले, अनुभवविश्य व्यापक झाले. १९७५ नंतर नवीन पर्वाची सुरूवात झाली. 'आज कॉल सेंटरपासून लष्करी सेवेपर्यंत स्त्रिया यशस्वीपणे पोहचलेल्या दिसतात.

भारतीय राजकारणात स्त्रीचा प्रवेश प्रामुख्याने १९१७ साली डॉ.ॲनी बेझंट यांच्या रुपाने झाला. त्यानंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणाऱ्या आचार विचारात स्वातंत्र्याची निष्ठा सतत बाळगणाऱ्या विद्वान विदुषी सरोजिनी नायडू यांच्या रुपाने भारतीय स्त्री जीवनाचे उदात्त दर्शन जगाला झाले. त्या १९२५ साली राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष निवडल्या गेल्या. या विश्वविख्यात स्त्रीच्या पाठोपाठ राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासात पाऊल टाकले ते इंदिरा गांधी यांनी. त्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या.

पन्नाशीच्या दशकात संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि गोवा मुक्ती आंदोलनात महिलांचा सहभाग होता. प्रमिला ओक या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सहकार्यवाह होत्या. १५० स्त्रिया दिल्ली येथील आंदोलनात सहभागी झाल्या होत्य १९६२ ची निवडणूक संयुक्त महाराष्ट्रच्या स्थापनेनंतरची पहिलीच निवडणूक होती. या विधानसभेच्या निवडणुकीत २६४ जागांसाठी निवडणूका झाल्या होत्या. १९९०,१९९५,व १९९९ अशा तीन निवडणुकांमध्ये

मिळून २९ महिला महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आल्या होत्या. १९९० मध्ये ०६ महिला, १९९५ मध्ये ११ व १९९९ मध्ये १२ महिला निवडून आल्या सध्या महाराष्ट्र विधानसभेवर २४ महिला आमदार आहेत.

जून १९९४ मध्ये महाराष्ट्र राज्याने महिला धोरण जाहीर केले. सरकारी नोकऱ्यांत, पंचायती व नगरपालिका यात ३० टक्के व पुढे ३३ टक्के जागा राखीव ठेवल्या. महिलांवरील अत्याचाराविरोधी तात्काळ कडक कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी स्वतंत्र न्यायालयांची स्थापना केली.

अनेक स्त्रियांना राजकारणात आल्यानंतर आपल्या कर्तव्याची जाणीवही झाली त्यांनी शिक्षण पाणीयोजना, अस्वच्छता, बालविवाह, कुपोषण, रोगराई, दारुबंदी, स्त्रियांवरील अत्याचार यासारखे अनेक प्रश्न अग्रक्रमाने मांडले.

गांधीजीना स्त्रीशक्तीची प्रथम जाणीव आफ्रिकेमध्ये झाली. आफ्रिकेतील सत्याग्रहाचे नेतृत्व करताना गांधीजींनी स्त्रियांना पाहिले तेव्हा त्यांना जाणवले की, पुस्तकी विद्येने नव्हेतर सहनशक्ती व विश्वास यातून निर्माण झालेले कणखर मन हे नेतृत्वासाठी जरूरीचे आहे असहकार आंदोलनात कस्तुरबांच्या नेतृत्वाखाली अनेक स्त्रिया आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. सुभाषचंद्र बोस यांच्या सहकार्याने लतिका घोष या ऑक्सफर्ड मध्ये शिकलेल्या शिक्षिकेने सन १९२८ मध्ये महिला राष्ट्रीय संघाची स्थापना केली. स्त्रियांचा दर्जा सुधारण्याखेरीज देश स्वतंत्र होणार नाही आणि जोपर्यंत देश सुधारणार नाही. तोपर्यंत स्त्रियांची स्थिती सुधारणार नाही असे या संघटनांतील स्त्रियांची भूमिका होती.

बी.अमन, लाडोरानी झुत्सी, सत्यवतीदेवी, मॅडम भिकाजी काया, भगिनी निवेदिता, ननीबाळा देवी, क्रांतिकारी प्रतिलता वफदार, विना दास, शांती घोष, सुनीती चौधरी, नागारानी गिडालू, अरुना असफअली, मातंगिरी हाजरा अशा कितीतरी स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाने देशाचे नाव जगाच्या इतिहासात नोंदविले आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये उत्तंग भरारी मारली आहे जी क्षेत्रे पूर्वी तिच्यासाठी दुर्लक्षित अशी होती. अवनी चतुर्वेदी, भावना कांत आणि मोहना सिंग भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच फायटर पायलट सुपरसॉनिक फायटर जेट विमान उडवणाऱ्या महिला आहेत. अंतराळात जाणारी पहिली भारतीय महिला म्हणून कल्पना चावला हिचा गौरव केला जातो.भारतीय सैन्यात भरती होणारी प्रिया जिंघन ही पहिली भारतीय महिला आहे. बचेंद्री पॉल यांचा विशेष उल्लेख करावा लागेल या एवरेस्ट सर करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या.भारत सरकारने २०१९ साली त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. खेळ विश्वात पी.व्ही. सिंधू यांनी रिओ ऑलिम्पिक मध्ये महिला बॅडमिंटन स्पर्धेत रौप्य पदक कमावले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६००० धावांचा टप्पा पार करणारी मिताली राज ही पहिली भारतीय महिला क्रिकेटर ठरली आहे.अशा विविध

नाविन्यपूर्ण क्षेत्रात स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. त्यांची यशस्वी घोडदौड आजही चालूच आहे.

स्त्रीमुक्तीची संकल्पना ही मोठमोठ्या स्त्रीनेत्या जेव्हा बाहेर पडून अमेरिकेतील तरुण स्त्रियांसमोर बोलण्यासाठी उभ्या ठाकल्या तेव्हा या सर्वजणींनी पुन्हा पुन्हा एका आणि एकाच विषयावर चर्चा केली. तो विषय म्हणजे स्त्रियांना पुरूषाशी यशस्वीरित्या स्पर्धा कशी करता येईल? किंवा स्त्रियांनी पुरूषांसारखं वागायला कसं शिकायचं? त्यांची भाषणे संतापानं, वैषम्यानं भरलेली असत. स्त्रियांनी कणखर झालं पाहिजे, युध्दास सिध्द झालं पाहिजे. या जगात आपली खेळी नीट खेळायची असेल तर पुरूषांसारखी चाल करणं शिकल पाहिजे. असा त्यांच्या भाषणांचा एकंदर सूर असे. पण हे सगळं जरी असलें तरी एकीकडे आपल्या यशस्वी कारकीर्दीसाठी संसाराचा त्याग करुन बाहेर पडणाऱ्या स्त्रिया,विविध क्षेत्रात दिसतात. त्यांतील कित्येक महिलांनी आपल्या ध्येयसिध्दीसाठी संसार मुलेबाळे यांसारख्या गोष्टींवर पाणी सोडलेले असते. पण तरीसुध्दा आपली कारकीर्द यशस्वी झाल्यावरही या स्त्रिया वारंवार स्वतःला एकच प्रश्न विचारताना दिसतात. आज जीवनात इतके यश प्राप्त केल्यानंतर जे समाधान मला मिळायला हवं होतं ते आज मला खऱ्या अर्थानं मिळालेलं आहे का? हा प्रश्न त्या स्वतःच्या मनाशी विचारतात म्हणजेच आपण आज खरोखर यशस्वी झालो का? ही शंका त्यांच्या मनाला भेडसावत असते. कारण त्यांना मनोमन त्मा गोष्टीची खात्री पटलेली नसते.

पाश्चात्य स्त्रीमुक्ती विचारात पुरूषविरोधी स्त्रीच्या व्यक्तिवादाची स्थापना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य व समानता या तत्वांवर अधिक भर दिला गेला आहे. भारतात स्त्री विरूध्द पुरूष अशी भावना नसून स्त्रियांच्या उध्दाराचे काम मोठ्या प्रमाणात पुरूषांनीच सुरू केले आहे. भारतात कुटुंबव्यवस्थेला महत्व असल्याने पिता,भाऊ, पती, मामा, काका इ.नातेसंबंधातून स्त्री विकासाचे मार्ग खुले होतात. व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा व्यापक समाजहितासाठी त्याग करण्याची परंपरा भारतात असल्याने स्त्रीमुक्तीचा विचार भारतीय परिप्रेक्ष्यात पाश्चात्य विचारांपेक्षा वेगळा करण्याची गरज भासते.

पुरुषांचे अनुकरण करण्यात पुरूषांप्रमाणे बनण्यात स्त्रीचे खरे यश सामावलेले नाही हे आजच्या काळात स्पष्टपणे अधोरेखित होणे आवश्यक आहे. 'पुरूष' आणि 'स्त्री' ही मानवजातीची दोन अविभाज्य परंतु स्वतंत्र अंग आहेत. दोन भिन्न घटक आहेत. मानवजातीच्या या दुसऱ्या अत्यंत महत्वाच्या घटकांत जी नैसर्गिक विद्वत्ता आहे; जे शहाणपण आहे त्याचा जगाला उपयोग करुन द्यायला हवा. कारण हे युग समतेचे आहे.

**संदर्भ :**

१) शेणेलीकर ह.श्री.व देशपांडे प्र.न. महाराष्ट्राचा सामाजिक सांस्कृतिक इतिहास, जुलै २०१२ पृ.क्र.१०९

२) जगताप मु. युगपुरूष म.फुले, चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई प्रथम आवृत्ती १९९३ पृ.क्र.१०
३) पवार ना.ग.सावित्रीबाई फुले व्यक्तिमत्व, पद्यगंधा प्रकाशन समिती, मुंबई प्रथम आवृत्ती २५ फेब्रुवारी२००४ पृ.क्र. ३०,३२
४) कर्वे स्वाती,(संपादक) स्त्रीविकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती ८ मार्च २००८ पृ.क्र. ०५
५) कित्तापृ.क्र.१७२
६) पवार वै. महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख, डायमंड पालिकेशन्स, पुणे प्रथम आवृत्ती, २०१२ पृ.क्र.२६
७) कित्ता पृ.क्र.५८
८) पाटील प.व जाधव शो. भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन कोल्हापूर प्रथम आवृत्ती मार्च २००७ पृ.क्र. २७४
९) कित्ता पृ.क्र.२७४
१०) कित्ता पृ.क्र.२४८,२४९
११) कित्ता पृ.क्र.२५३.
१२) कर्वे स्वाती, (संपादक) स्त्री विकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती मार्च २००८ पृ. क्र. ४९६.

***